Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

जीवाला धोका असल्याचे सांगत आठ तोळे सोन्याचे दागिने लंपास

(पान २ वर)



।सोमवार, दि. १५ जून २०२६। वर्ष १ ।अंक ७० ।पाने २। DIGITAL EDITION

» Selected

## जळगाव विधान परिषद उमेदवारीवरून रक्षा खडसे-गिरीश महाजन आमनेसामने?

जळगाव | जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर जिल्ह्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. स्पर्धेत अन्य इच्छुकांची नावे चर्चेत असताना नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी मिळाल्याने राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात होते. राजकीय वातावरण आणखी तापले आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर गिरीश महाजन यांनी हा निर्णय पक्षश्रेष्ठींनी आणि दिल्लीतील नेतृत्वाने घेतल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर या निर्णयाबाबत केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांना विचारणा करण्यात आली असता त्यांनी, "हा निर्णय माझा नाही. जळगाव जिल्हा आणि उत्तर महाराष्ट्रातील सर्व राजकीय निर्णय मंत्री गिरीश महाजन हेच घेतात. मी तर एक लहान कार्यकर्ता आहे," अशी प्रतिक्रिया दिली.

### तिसऱ्या दिवशी उपोषणाला पूर्णविराम • मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर सकारात्मक तोडगा

# रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन स्थगित!

## शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागण्यांवर मुख्यमंत्र्यांसोबत शिष्टमंडळाची बैठक होणार

**जन सम्राट टाईम्स**

**सोलापूर : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन अखेर तीन दिवसांनंतर स्थगित करण्याची घोषणा केली. राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी आंदोलनस्थळी भेट देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा केली. त्यानंतर शेतकऱ्यांच्या मागण्यांवर पावसाळी अधिवेशनापूर्वी सकारात्मक बैठक घेण्याचे आश्वासन मिळाल्याने रोहित पवार यांनी उपोषण मागे घेतले.**

पंढरपूर येथे सुरू असलेल्या आंदोलनाचा तिसरा दिवस असताना रोहित पवार यांची प्रकृती चिंताजनक बनली होती. डॉक्टरांनी त्यांच्या शरीरातील रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी कमी झाल्याचे सांगत तातडीने सलाईन घेण्याचा सल्ला दिला होता. मात्र, मंत्री गिरीश महाजन येईपर्यंत कोणताही वैद्यकीय उपचार स्वीकारणार नसल्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली. रात्री सुमारे सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास मंत्री गिरीश महाजन आंदोलनस्थळी दाखल झाले. यावेळी त्यांनी रोहित पवार यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि आंदोलनाऐवजी चर्चेच्या माध्यमातून मार्ग काढण्याचे आवाहन केले. त्याचवेळी त्यांनी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवर संवाद साधून आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांबाबत माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी शेतकरी कर्जमाफी आणि इतर संबंधित विषयांवर सकारात्मक भूमिका घेत पावसाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी आंदोलकांच्या शिष्टमंडळासोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. या बैठकीत योग्य तो निर्णय घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल, असे गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गिरीश महाजन यांनी यावेळी महत्त्वाची माहिती देताना राज्य विधिमंडळाचे आगामी पावसाळी अधिवेशन २२ जूनपासून सुरू होणार असल्याचे सांगितले. त्यापूर्वी रोहित पवार आणि शेतकरी नेत्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. उपोषण स्थगित करण्याची घोषणा करताना रोहित पवार यांनी आंदोलनाला मिळालेल्या जनसमर्थनाबद्दल सर्वांचे आभार मानले. तसेच, मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनाचा मान राखत आपण अन्नत्याग आंदोलन स्थगित करत असल्याचे सांगितले. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील नामदेव पायरीवर नतमस्तक होऊन आंदोलनाची सांगता करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. दरम्यान, मंत्री गिरीश महाजन नियोजित वेळेपेक्षा उशिरा आंदोलनस्थळी पोहोचले. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात पिकअप वाहन विहिरीत कोसळून आठ भाविकांचा मृत्यू झालेल्या दुर्घटनेतील जखमींची भेट घेण्यासाठी ते प्रथम घटनास्थळी गेले होते. त्यानंतर त्यांनी पंढरपूर गाठून रोहित पवार यांच्याशी चर्चा केली. राज्यातील शेतकरी प्रश्न आणि कर्जमाफीच्या मुद्द्यावर आता सरकार आणि आंदोलक यांच्यात थेट चर्चेचा मार्ग मोकळा झाला असून अधिवेशनापूर्वी होणाऱ्या बैठकीकडे राज्यभरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### काय म्हणाले रोहित पवार?


गिरीश महाजन यांच्या भेटीवेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की, 22 तारखेला अधिवेशन आहे. त्या आधी सरकार मिटिंग घेणार आहे. 30 जूनपासून कर्जमाफी लागू होणार आहे. जे बदल आहे, ते 30 जून आधी होणार आहे. सरकारने आमच्या मागण्या मान्य कराव्यात. आपल्याकडे थोडा वेळ आहे. आपण चर्चेला मुख्यमंत्र्यांकडे गेले पाहिजे का? चर्चेला राजू शेट्टी, अजित नवले, शशिकांत शिंदे. हर्षवर्धन सपकाळ, रविकांत तुपकर आणि ठाकरे गटाचे नेतेही असतील. शेकापचे जयंत पाटील असतील. महादेव जानकर असतील. सर्व शेतकरी नेते आहेत.सरकार त्या ठेवणार नाही. पण त्यात गडबड झाली तर 4 जुलै रोजी मराठवाड्यात आंदोलन करू. बैठक ठरली आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## तापी नदी आणि वाघूर धरणात बुडून दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू

### अकाली निधनाने दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर

**जन सम्राट टाईम्स**




**भुसावळ | प्रतिनिधीः** भुसावळ शहरावर रविवारी दुहेरी दुःखाचा डोंगर कोसळला. वेगवेगळ्या घटनांमध्ये तापी नदी आणि वाघूर धरणात बुडून दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. गंगाराम प्लॉट येथील १६ वर्षीय प्रतीक अनिल महाजन आणि गवळीवाडा परिसरातील २२ वर्षीय आवेश गफार गवली यांच्या अकाली निधनाने संपूर्ण शहरात शोककळा पसरली असून दोन्ही कुटुंबांवर काळाने घाला घातला आहे. तापी नदीत बुडून विद्यार्थ्याचा मृत्यू गंगाराम प्लॉट परिसरातील रहिवासी अनिल सुखदेव महाजन यांचा मुलगा प्रतीक अनिल महाजन हा आपल्या मित्रांसोबत तापी नदीवर फिरण्यासाठी गेला होता. दुपारी सुमारे १२.३० वाजेच्या सुमारास नदीत उतरलेला प्रतीक अचानक खोल पाण्यात गेल्याने बुडाला. ही घटना लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. प्रतीकने नुकताच अकरावी इयत्तेत प्रवेश घेतला होता. अभ्यासू, शांत आणि मनमिळावू स्वभावामुळे तो मित्रपरिवारात लोकप्रिय होता. त्याच्या अकाली निधनाने महाजन कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गंगाराम प्लॉट परिसरात शोकमय वातावरण निर्माण झाले आहे. वाघूर धरणात आवेश गवलीचा दुर्दैवी अंत दुसऱ्या घटनेत भुसावळच्या गवळीवाडा परिसरातील २२ वर्षीय आवेश गफार गवली याचा वाघूर धरणात बुडून मृत्यू झाला. आवेश आपल्या दोन मित्रांसह धरण परिसरात फिरण्यासाठी गेला होता. त्यानंतर तिघेही आंघोळीसाठी पाण्यात उतरले.

### बचाव पथकाने तातडीने शोधमोहीम सुरू केली

मात्र पाण्याच्या खोलीचा अचूक अंदाज न आल्याने आवेश खोल पाण्यात जाऊन बुडाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि बचाव पथकाने तातडीने शोधमोहीम सुरू केली. अनेक तासांच्या अथक प्रयत्नानंतर आवेशचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. त्यानंतर शवविच्छेदनासाठी मृतदेह जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला.

## नशिराबाद येथे भव्य ‘श्याम संकीर्तन’ सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न

### कान्हा व्यास यांच्या सुमधुर भजनांनी भाविक मंत्रमुग्ध; शेकडो भक्तांची उत्स्फूर्त उपस्थिती

**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद | प्रतिनिधीः** नशिराबाद येथील सुनसगाव फाट्याजवळील मंगलमूर्ती लॉन येथे श्री श्याम परिवार, जळगाव-नशिराबाद यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य ‘श्याम संकीर्तन’ सोहळा शनिवारी भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. या सोहळ्याला नशिराबादसह जळगाव परिसरातील शेकडो भाविकांनी उपस्थित राहून बाबा श्याम यांच्या दर्शनाचा आणि संगीतमय भजनांचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून प्रसिद्ध भजन गायक कान्हा व्यास (ग्वाल्हेर, मध्य प्रदेश) यांनी आपल्या सुमधुर आवाजात बाबा श्याम यांच्या महिम्याचे वर्णन करणारी एकापेक्षा एक सरस भजने सादर केली.

त्यांच्या सुरेल गायकीने संपूर्ण



परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. “हरे का सहारा, बाबा श्याम हमारा” या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने उपस्थित भाविक भारावून गेले. भजनांच्या तालावर अनेक भक्तांनी टाळ्यांच्या गजरात आणि भक्तिभावाने नृत्य करत आपली श्रद्धा व्यक्त केली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान भक्तीचा अविस्मरणीय माहोल अनुभवायला मिळाला. सोहळ्यासाठी मंगलमूर्ती लॉन येथे आकर्षक आणि भव्य मंडप उभारण्यात आला होता. फुलांनी सजविण्यात आलेला बाबा श्याम यांचा देखणा दरबार उपस्थितांचे विशेष आकर्षण ठरला. महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तसेच शिस्तबद्ध नियोजनामुळे भाविकांना कोणत्याही अडचणीशिवाय कार्यक्रमाचा आनंद घेता आला. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री श्याम परिवार, जळगाव, नशिराबाद आणि अण्णा नगर येथील सर्व सदस्य, पदाधिकारी आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपाला महाआरती करण्यात आली आणि उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. उशिरापर्यंत रंगलेल्या या संगीतमय आणि भक्तिमय श्याम संकीर्तन सोहळ्यामुळे संपूर्ण नशिराबाद नगरी भक्तीच्या रंगात रंगून गेली होती. उपस्थित भाविकांनी अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात आध्यात्मिक ऊर्जा आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली.

## भुसावळ-फैजपूर रस्ता १५ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी बंद!

### जड व हलक्या वाहनांसाठी स्वतंत्र पर्यायी मार्ग जाहीर

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ । प्रतिनिधीः** : भुसावळ ते फैजपूर या महत्त्वाच्या मार्गावरील प्रवाशांसाठी मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भुसावळ-फैजपूर रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून, काम सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी हा मुख्य रस्ता १५ जुलैपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) घेतला आहे. या निर्णयामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने



पर्यायी मार्गांची घोषणा केली आहे. फैजपूरकडून भुसावळकडे येणाऱ्या तसेच भुसावळहून फैजपूरकडे जाणाऱ्या ट्रक, कंटेनर आणि इतर जड वाहनांनी खालील मार्गाचा अवलंब करावाः कार, दुचाकी आणि इतर हलक्या वाहनांसाठी तुलनेने जवळचा पर्यायी मार्ग निश्चित करण्यात आला असून तो पुढीलप्रमाणे आहेः रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम वेगाने सुरू असल्याने संबंधित मार्गावर मोठ्या प्रमाणात यंत्रसामग्री आणि कामगार कार्यरत आहेत. त्यामुळे नागरिकांनी १५ जुलैपर्यंत मुख्य रस्त्याचा वापर टाळून पर्यायी मार्गांचाच अवलंब करावा, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. प्रवासाला निघण्यापूर्वी वेळेचे योग्य नियोजन करावे, तसेच वाहतूक नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरून कोणताही अपघात किंवा वाहतूक कोंडी होणार नाही आणि चौपदरीकरणाचे कामही नियोजित वेळेत पूर्ण होईल, असे आवाहनही संबंधित विभागाकडून करण्यात आले आहे.

## कुऱ्हा व दीपनगर येथे भुसावळ तालुका पोलिसांचे ‘अपघातमुक्त जनजागृती अभियान’

### हेल्मेटधारकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ | प्रतिनिधी :** वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने भुसावळ तालुका पोलीस स्टेशनतर्फे कुऱ्हा आणि दीपनगर येथे ‘अपघातमुक्त जनजागृती अभियान’ राबविण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमाला वाहनचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला कुऱ्हा येथे आयोजित कार्यक्रमात रिक्षाचालक, दुचाकीस्वार तसेच इतर वाहनधारकांना वाहतुकीच्या नियमांचे पालन, वेगमर्यादेचे महत्त्व,



हेल्मेट आणि सीट बेल्टचा वापर तसेच सुरक्षित वाहनचालक म्हणून असलेली जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानातील विशेष आकर्षण म्हणजे नियमित हेल्मेटचा वापर करणाऱ्या वाहनचालकांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. पोलिसांच्या या अभिनव उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षित वाहनचालक बनण्याचा सकारात्मक संदेश पोहोचला. दरम्यान, दीपनगर येथे ट्रक, बल्कर आणि मालवाहतूक वाहन चालकांची विशेष ‘कॉर्नर मिटिंग’ घेण्यात आली. या बैठकीत वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, निर्धारित वेगमर्यादेचे पालन करणे, वाहनांची आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवणे तसेच धोकादायक पद्धतीने ओव्हरटेक न करणे याबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी केवळ पोलीस प्रशासन नव्हे तर प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.


जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## शिरपूरमध्ये फळांच्या गोदामाला भीषण आग; लाखो रुपयांचे नुकसान

### भंडारी टॉकीज परिसरातील 'हिंदुस्तान फ्रुट' गोदाम ज्वाळांच्या भक्ष्यस्थानी

**जन सम्राट टाईम्स**

**शिरपूर | प्रतिनिधी :** शिरपूर शहरातील भंडारी टॉकीज परिसरात रविवारी मोठी आग लागल्याची घटना घडली. येथील 'हिंदुस्तान फ्रुट' या फळांच्या गोदामाला अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीत गोदामातील मोठ्या प्रमाणावरील फळसाठा आणि इतर साहित्य जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. आग लागल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने अग्निशमन विभागाला कळविले. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू



आहेत. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या उंच ज्वाळांमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक माहितीनुसार विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र याबाबत अधिकृत तपासानंतरच निश्चित कारण समोर येणार आहे. जीवितहानीची माहिती नाही सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र गोदामातील मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेल्या फळांचे आणि इतर मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. प्रशासनाकडून पंचनामा सुरू होणार आग पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर संबंधित विभागाकडून घटनास्थळाचा पंचनामा करून नुकसानीचा अचूक अंदाज घेतला जाणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून आग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत.

### नुकसानीचा अचूक अंदाज घेतला जाणार

अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या उंच ज्वाळांमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक माहितीनुसार विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाजव्यक्तकरण्यातयेतआहे.मात्रयाबाबतअधिकृततपासानंतरच निश्चित कारण समोर येणार आहे.जीवितहानीची माहिती नाही सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र गोदामातील मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवलेल्या फळांचे आणि इतर मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. प्रशासनाकडून पंचनामा सुरू होणार आग पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतर संबंधित विभागाकडून घटनास्थळाचा पंचनामा करून नुकसानीचा अचूक अंदाज घेतला जाणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे व्यापारी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून आग प्रतिबंधक उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होत आहेत.

## भाविकांच्या पिकअपचा विहिरीत भीषण अपघात; ८ जणांचा मृत्यू

**जन सम्राट टाईम्स**

**सोलापूर | प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यात रविवारी घडलेल्या भीषण अपघाताने संपूर्ण राज्याला हादरा बसला आहे. तांदळवाडी परिसरात भाविकांना घेऊन जाणारी पिकअप रस्त्यालगतच्या पाण्याने भरलेल्या विहिरीत कोसळल्याने आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर सात जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावातील भाविक म्हसवड येथील सिद्धनाथांच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून गावाकडे परतत असताना तांदळवाडी येथे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पिकअप थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत कोसळली. विहीर पाण्याने काठोकाठ भरलेली असल्याने अनेकांच्या नाकातोंडात पाणी जाऊन त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, बचाव पथके आणि प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली.मात्र आठ जणांना आपले प्राण गमवावे लागल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त करत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. तसेच मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात राज्य सरकार सहभागी असल्याचे सांगत प्रत्येक मृताच्या वारसाला प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक घटनास्थळी रवाना झाल्याची माहिती देत प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचे स्पष्ट केले. तसेच जखमींवर सर्वोत्तम उपचार करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

# भडगाव हादरले! जुन्या वादाचे हिंसक रूप; महिलेवर लोखंडी हुकाने जीवघेणा हल्ला!

## गंभीर जखमी महिलेवर उपचार, दोन आरोपी पोलिस कोठडीत

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** भडगाव शहरातील यशवंतनगर परिसरात जुन्या वादातून एका महिलेवर लोखंडी हुकासारख्या धारदार वस्तूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी रात्री घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेवर जळगाव येथील खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, भडगाव पोलिसांनी तातडीने कारवाई करत दोन संशयितांना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावल्याने या प्रकरणाचा तपास अधिक वेगाने सुरू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यशवंतनगर येथील रहिवासी कविता सुरेश पाटील यांचा शेजारी राहणारे असलम बिस्मिल्ला शेख आणि त्यांची पत्नी शमीन असलम शेख यांच्याशी काही दिवसांपासून वाद सुरू होता. किरकोळ कारणांवरून दोन्ही कुटुंबांमध्ये वारंवार शाब्दिक चकमकी होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. शुक्रवारी रात्री सुमारे नऊ वाजेच्या सुमारास हा वाद पुन्हा उफाळून आला. सुरुवातीला झालेला वाद



काही क्षणांतच हिंसक वळणावर पोहोचला. संतापाच्या भरात संशयितांनी लोखंडी हुकासारख्या वस्तूने कविता पाटील यांच्यावर सपासप वार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्यांच्या गळ्यावर, डोक्यावर आणि शरीराच्या विविध भागांवर गंभीर जखमा झाल्या. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे त्यांना स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळाली नाही आणि त्या रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या. महिलेच्या किंकाळ्या ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी तत्काळ जखमी महिलेला मदत करत भडगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जळगाव येथील खासगी रुग्णालयात हलविले. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच भडगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुरावे गोळा केले. तसेच प्रत्यक्षदर्शी नागरिकांचे जबाब नोंदविण्यात आले. या प्रकरणी जखमी महिलेची सून राधा सागर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून असलम बिस्मिल्ला शेख आणि शमीन असलम शेख यांच्याविरुद्ध विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केलेपोलिस कोठडी सुनावली आहे. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन उपविभागीय पोलीस अधिकारी विजय ठाकूरवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुशील सोनवणे या प्रकरणाचा सखोल तपास करीत असून हल्ल्यामागील नेमके कारण, वापरण्यात आलेले हत्यार आणि पूर्वीच्या वादाचे स्वरूप याचा शोध घेतला जात आहे. या थरारक घटनेमुळे यशवंतनगर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, किरकोळ वादातून थेट जीवघेणा हल्ला झाल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. परिसरात पोलिस गस्त वाढविण्याची मागणीही स्थानिकांकडून करण्यात येत असून तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### प्रत्यक्षदर्शी नागरिकांचे जबाब नोंदविण्यात आले

न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडी सुनावल्याने या प्रकरणाचा तपास अधिक वेगाने सुरू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यशवंतनगर येथील रहिवासी कविता सुरेश पाटील यांचा शेजारी राहणारे असलम बिस्मिल्ला शेख आणि त्यांची पत्नी शमीन असलम शेख यांच्याशी काही दिवसांपासून वाद सुरू होता. किरकोळ कारणांवरून दोन्ही कुटुंबांमध्ये वारंवार शाब्दिक चकमकी होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. शुक्रवारी रात्री सुमारे नऊ वाजेच्या सुमारास हा वाद पुन्हा उफाळून आला. सुरुवातीला झालेला वाद काही क्षणांतच हिंसक वळणावर पोहोचला. संतापाच्या भरात संशयितांनी लोखंडी हुकासारख्या वस्तूने कविता पाटील यांच्यावर सपासप वार केल्याचा आरोप आहे. या हल्ल्यात त्यांच्या गळ्यावर, डोक्यावर आणि शरीराच्या विविध भागांवर गंभीर जखमा झाल्या. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे त्यांना स्वतःचा बचाव करण्याची संधीही मिळाली नाही आणि त्या रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या. महिलेच्या किंकाळ्या ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी तत्काळ जखमी महिलेला मदत करत भडगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी जळगाव येथील खासगी रुग्णालयात हलविले.

# जीवाला धोका असल्याचे सांगत आठ तोळे सोन्याचे दागिने लंपास

## वृद्धेला दोन भामट्यांनी बनविले लक्ष्य

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** धुळे शहरात अंधश्रद्धा आणि भीतीचा आधार घेत ७२ वर्षीय वयोवृद्ध महिलेची फसवणूक करून तब्बल आठ तोळे सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या महिलेला घरावर मोठे संकट आणि मुलाच्या जीवाला धोका असल्याची भीती दाखवत दोन अज्ञात भामट्यांनी बोलण्यात गुंतवले आणि तिच्याकडील दागिने घेऊन पसार झाले. या संपूर्ण घटनेचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मिल परिसरातील सुरतवाला बिल्डिंगजवळील जगदंबा हौसिंग सोसायटीत राहणाऱ्या प्रतिभा प्रकाश कुलकर्णी (वय ७२) या नेहमीप्रमाणे सकाळी मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडल्या होत्या. जिल्हा न्यायालय परिसरात पोहोचल्यानंतर दोन अज्ञात इसमांनी त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले. यानंतर त्यांनी संवाद साधत कुलकर्णी यांना त्यांच्या घरावर मोठे संकट आले असून मुलाच्या जीवावरही धोका



असल्याचे सांगितले. हा अनर्थ टाळण्यासाठी धार्मिक विधी करावा लागेल आणि त्यासाठी अंगावरील सर्व सोन्याचे दागिने काही वेळासाठी काढून द्यावे लागतील, असे सांगून त्यांनी वृद्ध महिलेचा विश्वास संपादन केला. दोघांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून प्रतिभा कुलकर्णी यांनी अंगावरील सुमारे आठ तोळे सोन्याचे दागिने त्यांच्याकडे दिले. त्यानंतर भामट्यांनी त्यांना "५१ पावले पुढे जा आणि मागे वळून पाहू नका," असे सांगितले. काही अंतर चालल्यानंतर संशय आल्याने त्यांनी मागे वळून पाहिले असता दोन्ही आरोपी घटनास्थळावरून फरार झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी आरडाओरड केली. आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मोठी गर्दी जमली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेत तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास ठेवू नये, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अशा फसवणुकीच्या प्रकारांपासून सावध राहावे, असेही पोलिसांनी नमूद केले आहे. दरम्यान, पीडित प्रतिभा कुलकर्णी यांनी घडलेल्या प्रकाराचे वर्णन करताना अश्रूंना वाट मोकळी करून दिली. शहर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्यांचा शोध सुरू आहे.

### पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले

जिल्हा न्यायालय परिसरात पोहोचल्यानंतर दोन अज्ञात इसमांनी त्यांना पत्ता विचारण्याच्या बहाण्याने थांबवले. यानंतर त्यांनी संवाद साधत कुलकर्णी यांना त्यांच्या घरावर मोठे संकट आले असून मुलाच्या जीवावरही धोका असल्याचे सांगितले. हा अनर्थ टाळण्यासाठी धार्मिक विधी करावा लागेल आणि त्यासाठी अंगावरील सर्व सोन्याचे दागिने काही वेळासाठी काढून द्यावे लागतील, असे सांगून त्यांनी वृद्ध महिलेचा विश्वास संपादन केला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# भडगावमध्ये पल्स पोलिओ मोहिमेसंदर्भात कार्यशाळा संपन्न

## बालआरोग्याबाबत जनजागृतीवर भर

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत १६ जून ते ३१ जुलै या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या 'स्टॉप डायरिया कॅम्पेन' तसेच २८ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या पार्श्वभूमीवर भडगाव येथे आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. समाधान वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. समाधान वाघ यांनी सांगितले की, अर्भक व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी अतिसार प्रतिबंध आणि योग्य व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राबविण्यात येणाऱ्या 'स्टॉप डायरिया कॅम्पेन'द्वारे नागरिकांमध्ये जनजागृती करून बालकांना वेळेवर उपचार उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. अतिसार हे बालमृत्यूमागील प्रमुख कारणांपैकी एक असले तरी वेळेत ओआरएस द्रावण व झिंक गोळ्यांचा वापर केल्यास आणि आवश्यक वैद्यकीय उपचार मिळाल्यास अनेक गंभीर परिणाम टाळता येतात. त्यामुळे या अभियानांतर्गत स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी, हात धुण्याच्या योग्य पद्धती, स्तनपानाला प्रोत्साहन, पूरक आहाराचे महत्त्व, वैयक्तिक स्वच्छता, संसर्ग प्रतिबंध



आणि लसीकरणाबाबत व्यापक जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पल्स पोलिओ मोहिमेबाबत माहिती देताना डॉ. वाघ यांनी सांगितले की, भारताला २०१४ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेकडून पोलिओमुक्त देश म्हणून प्रमाणपत्र मिळाले असले तरी शेजारील काही देशांमध्ये अद्याप पोलिओचे रुग्ण आढळत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून २८ जून रोजी देशभर पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे.

### घरोघरी जाऊन डोस पाजण्यात येणार

२९ जूनपासून ग्रामीण भागात पुढील तीन दिवस आणि शहरी भागात पुढील पाच दिवस घरोघरी जाऊन मोहिमेदिवशी वंचित राहिलेल्या बालकांना पोलिओचे डोस पाजण्यात येणार आहेत. कार्यशाळेत ग्रामीण रुग्णालय भडगावचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पंकज जाधव यांच्यासह तालुक्यातील चारही प्राथमिक आरोग्य केंद्रांतील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि गटप्रवर्तक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# e-KYC न केल्याने २ हजारांहून अधिक 'लाडक्या बहिणी' अपात्र

## वारंवार मुदतवाढ देऊनही प्रक्रिया अपूर्ण; दरमहा १,५०० रुपयांचा लाभ बंद

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । प्रतिनिधी :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक महिलांना ई-केवायसी (e-KYC) प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे मोठा फटका बसला आहे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने या महिलांना योजनेसाठी अपात्र घोषित करण्यात आले असून, त्यांनी आतापर्यंत घेतलेल्या लाभाच्या रकमेचीही शासनाकडून वसुली केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. राज्य सरकारने योजना सुरू झाल्यानंतर विविध ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे अपात्र व्यक्तींनी लाभ घेतल्याच्या तक्रारींची दखल घेत सर्व लाभार्थ्यांची सखोल पडताळणी सुरू केली होती. त्याअंतर्गत ई-केवायसी, आधार संलग्नता, बँक खात्यांची माहिती आणि कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची तपासणी करण्यात आली. प्रशासनाने लाभार्थी महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अनेकदा मुदतवाढ दिली होती. विविध माध्यमांतून जनजागृती करून वारंवार आवाहनही करण्यात आले. मात्र, त्यानंतरही नंदुरबार जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केली नाही. परिणामी त्यांना योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. या निर्णयामुळे संबंधित महिलांना दरमहा मिळणारा १,५००




रुपयांचा आर्थिक लाभ तत्काळ बंद होणार आहे. यासोबतच योजनेच्या सुरुवातीपासून गेल्या पावणेदोन वर्षांत शासनाकडून त्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कमही नियमानुसार परत वसूल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.बनावट कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेतल्याचे प्रकार उघडकीस आल्याची प्राथमिक माहिती आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधितांकडून संपूर्ण लाभाची रक्कम वसूल करण्याबरोबरच त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली असल्याचे समजते.

### चुकीची माहिती देणाऱ्या लाभार्थ्यांविरोधात कारवाई

नागरिकांनी शासकीय योजनांचा लाभ घेताना सर्व कागदपत्रे अचूक ठेवून आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने लाभार्थी महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अनेकदा मुदतवाढ दिली होती. विविध माध्यमांतून जनजागृती करून वारंवार आवाहनही करण्यात आले. मात्र, त्यानंतरही नंदुरबार जिल्ह्यातील दोन हजारांहून अधिक महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केली नाही. परिणामी त्यांना योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. या निर्णयामुळे संबंधित महिलांना दरमहा मिळणारा १,५०० रुपयांचा आर्थिक लाभ तत्काळ बंद होणार आहे. यासोबतच योजनेच्या सुरुवातीपासून गेल्या पावणेदोन वर्षांत शासनाकडून त्यांच्या खात्यात जमा झालेली रक्कमही नियमानुसार परत वसूल करण्याची प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती मिळत आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शासकीय योजनांमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी पडताळणी प्रक्रिया अधिक काटेकोर करण्यात आली असून नियमांचे पालन न करणाऱ्या किंवा चुकीची माहिती देणाऱ्या लाभार्थ्यांविरोधात आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

# एसटी बसमधून गुजरातला दारू तस्करीचा मोठा डाव उधळला; नंदुरबार पोलिसांची धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार । प्रतिनिधी :** नंदुरबारहून राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून गुजरात राज्यात अवैधरित्या विदेशी दारूची तस्करी करण्याचा मोठा प्रयत्न नंदुरबार शहर पोलिसांनी हाणून पाडला आहे. गुप्त माहितीच्या आधारे बसस्थानक परिसरात सापळा रचत पोलिसांनी धडक कारवाई केली असून, दोन संशयितांना ताब्यात घेत सुमारे ८७ हजार रुपये किमतीची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी एसटी बसचा वापर करून नंदुरबारहून गुजरातमधील डेडियापाडा येथे विदेशी मद्याची चोरटी वाहतूक करण्याच्या तयारीत होते. या हालचालीची गोपनीय माहिती नंदुरबार शहर पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने बसस्थानक परिसरात पाळत ठेवली आणि संशयितांची कसून तपासणी केली. तपासणीदरम्यान आरोपींकडील सामानातून मोठ्या प्रमाणात विदेशी दारूचा साठा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ दारूचा साठा जप्त करून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. प्राथमिक पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आलेल्या विदेशी मद्याची किंमत सुमारे ८७ हजार रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. गुजरात



राज्यात मद्यबंदी लागू असल्याने महाराष्ट्रातून विविध मार्गांनी दारूची अवैध तस्करी करण्याचे प्रकार अधूनमधून उघडकीस येत असतात. अशा पार्श्वभूमीवर एसटी बससारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करून दारू तस्करी करण्याचा हा प्रयत्न पोलिसांनी वेळेत उधळून लावल्याने मोठे यश मानले जात आहे. या प्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, आरोपींनी यापूर्वीही अशा प्रकारची तस्करी केली आहे का, त्यांचे इतर साथीदार कोण आहेत आणि या रॅकेटचा विस्तार किती मोठा आहे, याचा सखोल तपास पोलीस करीत आहेत. ही उल्लेखनीय कारवाई नंदुरबार शहर पोलीस निरीक्षक नीलेश देसले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे अवैध दारू तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, जिल्ह्यात अशा बेकायदेशीर कारवायांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# एकदिवसीय मॅट कबड्डी स्पर्धेला जल्लोषात सुरुवात

## ग्रामीण खेळाडूंना मिळाले नवे व्यासपीठ

जन सम्राट टाईम्स

**मंगरूळ (ता. पारोळा)| प्रतिनिधी:** गर्जना क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य एकदिवसीय मॅट कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन उत्साहपूर्ण आणि जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडले. पारोळा तालुक्याच्या इतिहासात प्रथमच मॅटवर कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने परिसरातील क्रीडाप्रेमी, युवक आणि खेळाडूंमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. स्पर्धेच्या उद्घाटनावेळी मैदानावर उपस्थित असलेल्या शेकडो प्रेक्षकांनी खेळाडूंचा टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त स्वागत करत त्यांचा उत्साह वाढविला. उद्घाटन समारंभात उपस्थित मान्यवरांनी कबड्डी हा केवळ एक खेळ नसून शिस्त, संघभावना, आत्मविश्वास, चिकाटी आणि संघर्षाची शिकवण देणारा जीवनमूल्यांचा खेळ असल्याचे प्रतिपादन केले. ग्रामीण भागात अनेक गुणवंत खेळाडू असून त्यांना योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाल्यास ते राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकरआबा पाटील, शेतकी संघाचे माजी अध्यक्ष विजुआबा पाटील, पंडितबापू पाटील, शेतकी संघाचे संचालक बबलूदादा पाटील, शेतकी संघाचे व्यवस्थापक भरतआण्णा पाटील, नगरसेवक मनोजभाऊ जगदाळे, नगरसेवक पंकजभाऊ मराठे, नगरसेवक विवेक



पाटील, मंगरूळचे सरपंच मुन्नाभाऊ पाटील, भूषण चव्हाण, एकनाथ पाटील, गोविंद पवार, सुशील पाटील यांच्यासह आयोजक मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "कबड्डीच्या मैदानावर घाम गाळणारा प्रत्येक खेळाडू हा उद्याचा विजेता असतो.असा प्रेरणादायी संदेश मान्यवरांनी स्पर्धकांना दिला. त्यांनी सहभागी सर्व संघांना मनःपूर्वक शुभेच्छा देत उत्कृष्ट आणि दर्जेदार खेळाचे प्रदर्शन करण्याचे आवाहन केले. स्पर्धेच्या उद्घाटनानंतर विविध संघांमध्ये रंगलेल्या चुरशीच्या सामन्यांनी उपस्थित प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन केले. प्रत्येक गुणासाठी खेळाडूंमध्ये झालेली झुंज, बचाव आणि चढाईचे थरारक डाव यामुळे मैदानावर रोमांचक वातावरण निर्माण झाले होते. तालुक्यात प्रथमच मॅटवर होत असलेल्या या स्पर्धेमुळे कबड्डीप्रेमींमध्ये विशेष आकर्षण निर्माण झाले असून, भविष्यातही अशाच दर्जेदार स्पर्धांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील क्रीडा प्रतिभेला नवे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकाचा विषय ठरत आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स अँकर न्यूज ज

# धुळे जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीन तातडीने सुरु करा

## झेरियन व हर्निया शस्त्रक्रिया जिल्हा रुग्णालयातच उपलब्ध करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम व सर्वसामान्य नागरिकांसाठी सुलभ व्हाव्यात, यासाठी माजी गटनेते तथा माजी नगरसेवक अमिन अ. करिम पटेल यांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे. विशेषतः अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले एमआरआय मशीन तातडीने कार्यान्वित करण्यासह सोनोग्राफी सेवा, प्रसूती विभाग आणि शस्त्रक्रिया सुविधा बळकट करण्याची मागणी त्यांनी केली आहे.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीनसाठी आवश्यक तांत्रिक कामे, स्वतंत्र कक्ष आणि विद्युत डीपीची उभारणी पूर्ण झालेली असूनही अद्याप मशीन उपलब्ध झालेले नाही. परिणामी रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये मोठा आर्थिक खर्च करून तपासण्या कराव्या लागत आहेत. त्यामुळे जनहित लक्षात घेऊन एमआरआय मशीन त्वरित सुरू करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय धुळे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता सोनोग्राफी तपासणीसाठी रुग्णांना तब्बल १५ ते १५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याचा मुद्दाही निवेदनातून मांडण्यात आला आहे. विशेषतः गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना याचा फटका बसत असल्याने अतिरिक्त तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करून सोनोग्राफी सेवा अधिक वेगवान आणि सक्षम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. प्रसूती व शस्त्रक्रिया विभागाबाबतही अमिन पटेल यांनी महत्त्वपूर्ण मागणी केली आहे. सध्या गुंतागुंतीच्या प्रसूती, उच्च रक्तदाबाशी संबंधित रुग्ण तसेच काही शस्त्रक्रियांसाठी रुग्णांना हिरे मेडिकल कॉलेज किंवा इतर रुग्णालयांमध्ये पाठवले जाते. त्यामुळे जिल्हा रुग्णालयातच सिझेरियन प्रसूती आणि हर्नियासारख्या महत्त्वाच्या शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून दिल्यास सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय दूर होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

### अद्याप मशीन उपलब्ध झालेले नाही

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्हा रुग्णालयात एमआरआय मशीनसाठी आवश्यक तांत्रिक कामे, स्वतंत्र कक्ष आणि विद्युत डीपीची उभारणी पूर्ण झालेली असूनही अद्याप मशीन उपलब्ध झालेले नाही. परिणामी रुग्णांना खासगी रुग्णालयांमध्ये मोठा आर्थिक खर्च करून तपासण्या कराव्या लागत आहेत. याशिवाय धुळे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता सोनोग्राफी तपासणीसाठी रुग्णांना तब्बल १५ ते १५ दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याचा मुद्दाही निवेदनातून मांडण्यात आला आहे. विशेषतः गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना याचा फटका बसत असल्याने अतिरिक्त तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करून सोनोग्राफी सेवा अधिक वेगवान आणि सक्षम करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे.